निगराणी

# ऊसावरील किडींचे नियंत्रण




राधिका वसू
(मो.नं. ७०३००५००३५)
सोज्वल शिंदे
वैष्णवी तथोडे
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर






ऊस हे देशभरातील महत्त्वाचे नगदी पीक आहे. आपल्या राज्यात किडींचा मोठा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे पिकाचे नुकसान होऊन लागवड तोट्याची ठरते. हे टाळण्यासाठी निवडक किडींना प्रतिबंध कसा करावा याची माहिती प्रस्तुत लेखात दिली आहे.

महाराष्ट्रात ऊस पिकावर सुमारे २५ किडींचा प्रादुर्भाव आढळतो त्यातील सद्यस्थितीमध्ये नुकसानकारक ठरणाऱ्या किडींच्या नियंत्रणाची माहिती घेऊ.

### १. खोडकीड

प्रादुर्भाव ऊस लागणीपासून ते मोठ्या बांधणीपर्यंत दिसून येतो.



हलकी जमीन, कमी पाणी व जास्त तापमानात प्रादुर्भाव जास्त वाढतो. या किडीचा प्रादुर्भाव फुटव्यावर व लागणीपेक्षा खोडवा पिकात अधिक दिसतो.

**लक्षणे** : वाळलेल्या पोंग्यावरून तसेच बुडख्याजवळ असलेल्या लहान लहान छिद्रावरून ही कीड ओळखता येते.

**परिणाम** : किडीमुळे ऊस उशिरा तयार होतो. उत्पादनात (३३%) व साखर उताऱ्यात (१ ते १.५%) घट येते.

**नियंत्रण**

हलक्या जमिनीत ऊसाची लागवड टाळावी व सुरु ऊसाची लागण १५ फेब्रुवारीपूर्वीच करावी.

अधिक प्रादुर्भावात शेत विरळ दिसते. एकरी रोपांचे योग्य प्रमाण राखण्यासाठी लावणीबरोबर प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये पुरेशी रोपे तयार करून ठेवावीत. योग्य वेळी नांग्या भरता येतात.

पाण्याच्या पाळ्या वेळेवर देण्यात अडचणी असतील तर सरीमध्ये पाचटाचे आच्छादन (मल्चिंग) अवश्य करावे. त्यामुळे खोडकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो.

ऊसाला एक ते दीड महिन्यानंतर बाळ बांधणी करावी, त्यामुळे खोडकिडीचे पतंग बाहेर पडणारी छिद्रे बंद होतात.

ऊस लागवडीनंतर ४० ते ४५ दिवसांनी हेक्टरी ३ ते ४ फुले ट्रायकोकार्ड या प्रमाणात साधारणतः १० ते १५ दिवसांच्या अंतराने वापरावीत.

खोडकीडग्रस्त ऊस उपटून अळीसह नष्ट करावा.

हेक्टरी ५ कामगंध (इ.एस.बी. ल्यूर) शेतात लावावे.

क्लोरॲण्ट्रानिलिप्रोल (०.४ जी.आर.) १८.७५ किलो प्रतिहेक्टरी जमिनीतून वापरावे.

### २. कांडीकीड

या किडीचा प्रादुर्भाव कांडी तयार झाल्यापासून ऊस तोडणीपर्यंत आढळतो.


भरपूर तापमान, कमी आर्द्रता आणि कमी पाऊस त्यामुळे कांडी किडीचा प्रादुर्भाव वाढतो.

**लक्षणे** : पाचट काढले असता त्यात किडीची विष्ठा व भुसा आढळून येतो.

**परिणाम** : ऊसाची वाढ कमी होते, कांड्या लहान राहतात, ऊसास पांगश्या फुटतात, या किडीमुळे ऊस उत्पादनात ३५% तर साखर उताऱ्यात २.९ ते ३.० टक्के घट होते.

**नियंत्रण**

कीडविरहित बेण्याची लागवड करावी.



अधिक प्रादुर्भाव असलेल्या शेतात ५, ७, व ९ व्या महिन्यात खालील पाने काढून टाकावीत.

नत्रयुक्त खते शिफारशीप्रमाणेच द्यावीत.

पाणथळ जागी पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल, याकडे लक्ष द्यावे.

अधिक प्रादुर्भावग्रस्त भागात खोडवा घेणे टाळावे.

लागवडीनंतर चार महिन्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने हेक्टरी पाच ते सहा ट्रायकोकार्ड ऊस तोडणीच्या एक महिने आधीपर्यंत वापरावीत.

क्लोरॲण्ट्रानिलिप्रोल (०.४ जी.आर.) १८.७५ किलो प्रतिहेक्टरी जमिनीतून वापरावे.

### ३. शेंडेकीड

ऊस उगवणीपासून तोडणीपर्यंत प्रादुर्भाव दिसून येतो. ऑक्टोबर महिन्यात अधिक प्रादुर्भाव आढळून येतो.

हवेत भरपूर आर्द्रता, मध्यम तापमान आणि उशिरा व जास्त येणारा पाऊस यामुळे या किडीचा प्रादुर्भाव वाढतो.

**लक्षणे** : शेंडा वाळतो, पानावर लहान लहान आडवी एका रेषेत छिद्रे दिसतात. असा शेंडा सहजासहजी उपसून येत नाही. शेंडा वाळल्यामुळे बाजूचे डोळे फुटतात. ऊसाचा खराट्यासारखा आकार तयार होतो.

**नियंत्रण**

ट्रायकोकार्ड ५-६ प्रतिहेक्टर १५ दिवसांच्या अंतराने

वापरावे.

कामगंध सापळे (टी.एस.बी. ल्यूर) ४ ते ५ या प्रमाणात प्रतिहेक्टरी वापरावे.

क्लोरअॅण्ट्रानिलिप्रोल(०.४ जी.आर. ) १८.७५ किलो प्रतिहेक्टरी जमिनीतून वापरावे.

४. **मूळ कुरतडणारी अळी (बुडखा कांडीकीड)**

शेंड्याची पाने वाढलेली दिसतात तर इतर पाने पिवळी होतात. वाळलेला ऊस ओढल्यानंतर तो बुडख्यातून मोडून निघतो.

जमिनीलगतच्या खोडात पांढरट रंगाची अळी दिसून येते.

लागणीपेक्षा खोडवा पिकात प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात येतो.

**नियंत्रण**

वाळलेला पोंगा ओढून तारेने आतील अळी मारावी.

प्रादुर्भावग्रस्त फुटवे दर आठवड्याला खुडून नष्ट करावेत.

प्रकाश  सापळ्याचा वापर प्रौढ कीटक नष्ट करण्यासाठी करावा.

प्रादुर्भावगस्त ऊसाची तोडणी जमिनीलगत खोलवर करावी. प्रादुर्भावग्रस्त ऊस तोंडणी जमिनीलगत खोलवर करावी.

ट्रायकोकार्ड ५ ते ७ हेक्टरी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने वापरावेत.

फिप्रोनिल (०.३ जी.आर. ) २५ किलो प्रतिहेक्टरी जमिनीतून द्यावे.

५. **लोकरी मावा**

पिल्ले व प्रौढ पानाखाली स्थिर राहून अणकुचीदार सोंडेने पानातील अन्नरस शोषतात. पानाच्या कडा सुकतात. पाने वाळू लागतात. त्यांच्या विष्ठेद्वारे सोडलेल्या मधासारख्या चिकट पदार्थांवर काळ्या रंगाच्या कॅम्प्रोदियम या बुरशीची वाढ होते. पान संपूर्ण काळे पडल्याने पानाची कर्बग्रहणाची प्रक्रिया मंदावते. अधिक प्रादुर्भावामुळे पानाची लांबी व रुंदी कमी होऊन ऊसाची वाढ झपाट्याने खुंटते. ऊस उत्पादनात साधारणतः ११-२० टक्के, तर साखर उताऱ्यात ०.५-२.० युनिटने घट होते.

**कीड नियंत्रण**

कीडग्रस्त बेणे वापरू नये.

लागवडीपूर्वी मॅलॅथिऑन (५० टक्के प्रवाही) ३०० मि.लि. किंवा डायमेथोएट (३० टक्के प्रवाही) २६५



मि.लि. प्रति १०० लिटर पाणी या द्रावणात बेणे १५-२० मिनिटे बुडवून प्रक्रिया करावी.

ऊसाची पट्टा अथवा रुंद सरी पद्धतीने लागण करावी.

शेताच्या चोहोबाजूंनी दोन ओळी मका व दोन ओळी चवळी लावावी.

ऊस पिकास गरजेप्रमाणे आवश्यक तेवढेच पाणी व नत्र खत द्यावे.

डिफा ऑफिडिव्होरा, मायक्रोमस, सिरफीड माशी, लेडी बर्ड बिटल व क्रायसोपा या परभक्षी मित्रकीटकांच्या अळ्या ऊसावरील लोकरी मावा खातात. त्यासाठी डिफा ऑफिडिव्होरा हे परभक्षी मित्रकीटक १००० अळ्या किंवा कोष अथवा मायक्रोमस २५०० अळ्या प्रतिहेक्टरी सोडाव्यात. इंकार्सिया फ्लेव्होस्कुटेलम हा परोपजिवी कीटक जून ते डिसेंबर या कालावधीत आढळून येतो. या परोपजिवी कीटकामुळे लोकरी माव्याच्या पृष्ठभागावर लहान बारीक काळे छिद्र दिसते. असे काळे छिद्र असल्यास लोकरी माव्याच्या नियंत्रणासाठी काहीच करावयाची आवश्यकता नाही.

६. **पायरिला**

पाठीमागे चिमट्यासारख्या दोन शेपट्या असणारी पिल्ले



तसेच तपकिरी रंगाच्या प्रौढावस्था पानावर दिसतात. या किडीच्या प्रादुर्भावामुळे पाने पिवळी पडतात. अधिक प्रादुर्भावात पानावर काळी बुरशी वाढते. ऊसाच्या वजनात व साखर उताऱ्यात घट येते.

**नियंत्रण**

इप्रिकॅनिया मेलॅनोल्युका या मित्रकीटकाचे ५ हजार कोष अथवा ५ लक्ष अंडी प्रतिहेक्टरी सोडावीत.

ऑगस्ट महिन्यानंतर ऊसाची खालची पाने काढावीत.

पाकोळीची अंडी गोळा करून त्यांचा नाश करावा.

### ७. पांढरी माशी

दलदलीच्या ठराविक ठिकाणी या किडीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसून येतो. पानाच्या खालच्या बाजूस गोल, नाजूक, पांढरट पिल्ले व कोष दिसतात. ही कीड पानातील रस शोषून घेत असल्याने ऊस उत्पादनात व साखर उताऱ्यात घट येते.



**नियंत्रण**

पिकामध्ये पाणी साचत असल्यास चर काढून पाण्याचा निचरा करावा. मात्र पाण्याचा ताण पडू देऊ नये.

लागवड व खोडव्यास रासायनिक खतांची मात्रा शिफारशीनुसार व योग्य वेळी विभागून द्यावी.

खोलगट जमिनीत व नदीशेजारील भागात खोडवा ठेवायचे टाळावे.

व्हर्टीसिलियम लेकॅनी (फुले बगीसाईड) १ किलो अधिक १ लिटर दूध प्रति २०० लिटर हे द्रावण रात्रभर भिजत ठेवून, त्याची फवारणी करवी. पुढील फवारणी १०-१५ दिवसांच्या अंतराने द्यावी.

### ८. हुमणी

पानाची शीर व पाने पिवळी होतात. ऊस उपटला असता सहजासहजी उपसून येतो. मुळे खाल्लेली दिसून येतात. उपटलेल्या ऊसामध्ये हुमणीच्या 'सी' आकाराच्या पिवळसर रंगाच्या अळ्या दिसून येतात. दुर्लक्षित पिकामध्ये ८० ते १०० टक्के नुकसान होऊ शकते.



**नियंत्रण**

हुमणीच्या अळ्या आणि कोष नैसर्गिक शत्रूंना बळी पडण्यासाठी दोन नांगरणी जास्त कराव्यात. अतिप्रादुर्भावग्रस्त शेतात खोडवा ठेवू नये.

जमिनीत मेटारायझम सोप्ली किंवा बिव्हेरिया बसियाना २५ किलो शेणखतातून किंवा शेणकाला करून जमिनीत प्रतिहेक्टरी मिसळावे.

इमिडाक्लोप्रिड अधिक फिप्रोनिल ९४० टक्के + ४० टक्के) पाण्यात विरघळणारे दाणेदार कीटकनाशक ४४० ते ५५० ग्रॅम प्रतिहेक्टरी १००० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. ■

---

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).

email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**